# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे. -४११ ००१.
(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
Website : http//:barti.maharashtra.gov.in

## महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी जेईई (JEE) आणि नीट (NEET) या स्पर्धा परीक्षांच्या नागपूर या ठिकाणी पूर्व प्रशिक्षणासाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी जेईई ( JEE) आणि नीट ( NEET) या स्पर्धा परीक्षांचे नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षण खाजगी प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून जेईई (JEE) आणि नीट (NEET) या परीक्षांच्या पूर्व प्रशिक्षणाकरीता प्रत्येकी १०० असे एकूण २०० विद्यार्थ्यांसाठी **नागपूर** या ठिकाणी प्रशिक्षण राबविण्यात येत आहे.

**पात्रता** :-

१. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा .
२. उमेदवाराकडे महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा दाखला व अधिवास असावा.
३. उमेदवार शैक्षणिक वर्ष सन २०२३-२०२४ मध्ये इयत्ता ११ वी (विज्ञान) चे शिक्षण घेत असावा.
४. रु. ८ लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न मर्यादा असलेला उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र असेल.
५. अनाथ आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराकडे महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाकडून निर्गमित केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक.
६. दिव्यांग आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक

**आरक्षण** :-

- ❖ ३० % जागा महिलांसाठी, ४% जागा दिव्यांग असलेल्या व्यक्तींसाठी (Person with disability), ५% जागा अनुसूचित जाती अंतर्गत वंचित जाती मधील (वाल्मिकी व तत्सम जाती-होलार, बेरड, मातंग, मांग, मादगी, इ.साठी), १ % जागा अनाथ उमेदवारांसाठी आरक्षित असतील. तसेच एकूण जागांच्या ५ % जागा विशेष बाब म्हणून राखीव ठेवण्यात येईल.

**विद्यार्थी निवडीचे निकष** :-

- ❖ प्रशिक्षणातील सर्व जागांसाठी प्राधान्याने इयत्ता १० वीच्या गुणांच्या आधारे व रु.८ लाखापर्यंत उत्पन्न मर्यादा असलेल्या उमेदवारांची निवड केली जाईल.

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती** :-

१. **ऑनलाईन नोंदणी करण्याची शेवटची तारीख ३०/०७/२०२३**
२. प्रशिक्षण कालावधी १२ महिन्यांचा राहील.
३. निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दरम्यान ७५ टक्के पेक्षा जास्त कालावधी प्रशिक्षणास उपस्थित राहिल्यास त्या विद्यार्थ्यांना दरमहा रु.६०००/- एवढे विद्यावेतन अदा करण्यात येईल.
४. निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांना पुस्तक संचाकरीता प्रती विद्यार्थी रु.५०००/- एवढी रक्कम अदा करण्यात येईल.
५. सदर योजनेबाबत/ प्रशिक्षणाबाबत काही वाद अथवा धोरणात्मक पेच/प्रसंग निर्माण झाल्यास याबाबतचे अंतिम सर्व अधिकार मा. महासंचालक, बार्टी व शासनास राहतील.

- ❖ **इच्छुक व पात्र उमेदवारांनी दि.१४/०७/२०२३ पासून https://he.bartieducare.in/student/register या लिंकवरुन ऑनलाईन नोंदणी करावी.**
- ❖ निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या इच्छेनुसार नागपूर येथील पिरॅमिड ट्युटोरिअल , मोशन एज्युकेशन प्रा .लि., गाईडलाईन एज्युकेशन सर्विसेस, विलास अकॅडेमी ऑफ सायन्स, करियर कॅम्पस आणि ओयासिस शिक्षण संस्था या ६ नामनिर्देशित (Empanel) केलेल्या कोणत्याही एका प्रशिक्षण संस्थेमधून प्रशिक्षणाचा लाभ घेता येईल.

**Adv/ /२०२३/**

**(सुनिल वारे)**
**महासंचालक, बार्टी, पुणे**